गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २७९ वा ● गुरुवार २९ फेब्रुवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 279 | Date : 29/02/2024 blow :Thursday Page 4 Price 4

विविध प्रकल्प व योजनांतून देशाच्या भविष्याची पायाभरणी : प्रधानमंत्री

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा शुभारंभ; कोट्यवधी शेतकऱ्यांना लाभाचे वितरण

यवतमाळ : विविध योजना व प्रकल्पांद्वारे गेल्या १० वर्षात देशाच्या विकासाचा नवा पाया रचण्यात आला. देशाचा प्रत्येक कानाकोपरा विकसित करण्याचा आमचा संकल्प आहे. त्यासाठी गरीब, युवक, शेतकरी व महिला या घटकांच्या सशक्तीकरणासाठी व्यापक निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे विकासप्रक्रियेला गती मिळून देशाच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी होत आहे, असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज येथे केले.

प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते विविध महत्वाकांक्षी प्रकल्पांचा शुभारंभ, पंतप्रधान किसान सन्मान निधीअंतर्गत देशातील ९ कोटी शेतकरी कुटुंबांना एकूण २१ हजार कोटी रू. व महाराष्ट्रातील विविध योजनांच्या लाभार्थ्यांना सुमारे ६ हजार ९०० कोटी रू. चे वितरण, तसेच राज्यातील सुमारे पाच हजार कोटी रू. निधीतून रस्ते, रेल्वे व सिंचन प्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपूजन, तसेच यवतमाळ येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या पुतळ्याचे अनावरणही प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, कृषी मंत्री धनंजय मुंडे, मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड, इतर मागास, बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, खासदार भावना गवळी, खा.हेमंत पाटील, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, माजी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार नीलय नाईक, मदन येरावार, डॉ. अशोक उईके, संजीवरेड्डी बोदकुरवार,डॉ. संदीप धुर्वे, नामदेव

ससाणे, इंद्रनील नाईक आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले की, गत १० वर्षातील योजनांच्या अंमलबजावणीने देशात पुढील २५ वर्षांच्या विकासाचा पाया रचला आहे. गरीब, नवयुवक, शेतकरी व महिला हे चार घटक सशक्त झाले तरच देश विकसित होईल. हे लक्षात घेऊन अनेक प्रकल्प व योजनांतून शेतक-यांसाठी सिंचन, गरीबांसाठी घरे, महिलांच्या स्वावलंबनासाठी अर्थसाह्य व युवकांच्या भविष्यासाठी भक्कम पायाभूत सुविधा निर्माण केल्या जात आहेत. लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचा निधी थेट हस्तांतरित करण्यात येत आहे. ग्रामीण विकासासाठी हर घर जल, पीएम किसान निधी, लखपती दीदी योजना, स्वयंसहायता समूहाच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण आदी विविध योजनांचा त्यांनी उल्लेख केला.

प्रधानमंत्र्यांनी भाषणाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, संत सेवालाल महाराज, बिरसा मुंडा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन केले. मराठी व बंजारा भाषेतही त्यांनी उपस्थितांशी संवाद साधला. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, मागील दशक देशासाठी सुवर्णकाळ ठरला असून त्याचे शिल्पकार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आहेत. महिला, शेतकरी, गरीब आणि तरुण या समाजाच्या चार स्तंभांना बळ देण्याचे काम त्यांनी केले. त्यांनी संपूर्ण जीवन देशाला समर्पित केले असून, 'नेशन फर्स्ट'च्या माध्यमातून देशाला पुढे नेत आहेत. महाराष्ट्र संपूर्ण ताकदीनिशी त्यांच्यासमवेत आहे, असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, शेतकरी सन्मान योजनेत ४ हजार कोटीपेक्षा जास्त रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार असून, मोदी आवास योजनेत घरांमध्ये महिलांना घराचा संयुक्त मालकी हक्क मिळेल. साडेपाच लाख महिला बचत गटांना फिरता निधी उपलब्ध करून दिला जात आहे. गरीब, शेतकरी, युवक आणि महिलांसाठी योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरवर नेण्याचे प्रधानमंत्री । पान २ वर

मराठा आंदोलन ३ मार्चपर्यंत स्थगित; जरागेंची घोषणा

जालना : विद्यार्थ्यांच्या परीक्षा असल्याने मराठा आरक्षण आंदोलन ३ मार्चपर्यंत थगित करण्यात येत असून, तोपर्यंत फक्त धरणे आंदोलन केले जाणार आहे. पुढील आठ दिवस मराठा समाजाने शांत राहावे आणि सरकार काय करत आहे हे पाहावे. तसेच, महाराष्ट्रातील मराठा समाजाला सांगतो, आपल्यात चलबिचल नको, आपली ओबीसीमधून आरक्षणाची मागणी आहे, असे मनोज जरांगे-पाटील यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर शहरातील एका खासगी रुग्णालयात उपचार घेत असताना त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

जरांगे पुढे म्हणाले की, दडपशाही सुरू आहे, अंतरवाली सराटी येथील मंडप काढण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे । पान २ वर

डोहाळे जेवणाच्या कार्यक्रमावरुन परत येताना अपघात; १४ लोकांचा दुर्दैवी मृत्यू

मध्य प्रदेश : मध्य प्रदेशच्या दिंडोरी येथे एका भीषण अपघातात १४ लोकांचा मृत्यू झाला असून २१ जण जखमी असल्याची माहिती मिळत आहे. बडझर घाट येथे एका पिकअप वाहनाचे नियंत्रण सुटल्यानंतर सदर अपघात झाला, ज्यामध्ये १४ लोकांचा अपघातस्थळी मृत्यू झाला. मृतांमध्ये सहा पुरुष आणि आठ महिलांचा समावेश आहे. पिकअप वाहनातील सर्व लोक डोहाळे जेवणाच्या कार्यक्रमावरुन परत येत होते. या अपघातामध्ये जखमी झालेल्या लोकांवर शाहपुरा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ज्यामध्ये काही रुग्णांची परिस्थिती गंभीर असल्याचे सांगितले जाते. या पिकअप वाहनात एकूण ४५ प्रवाशी होते. पहाटे ३ ते ४ वाजण्याच्या दरम्यान बिच्छिया पोलीस ठाण्याच्या हद्दीत अपघात घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अमाही देवरी गावातील लोक डोहाळे जेवणाच्या कार्यक्रमासाठी मांडला जिल्ह्यात गेले होते. तिथून परत येत असताना ब्रेक फेल झाल्यामुळे चालकाचे पिकअप वाहनावरील नियंत्रण सुटले. ज्यामुळे वाहन उलटून रस्त्याच्या कडेला असलेल्या उतारावर २० फुटावर फेकले गेले. अपघाताची माहिती मिळताच जिल्हाधिकारी विकास मिश्रा आणि पोलीस अधीक्षक अखिल पटेल शाहपुरा रुग्णालयात पोहोचले. या दुर्घटनेनंतर मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी शोख व्यक्त केला. दिंडोरी जिल्ह्यात घडलेली दुर्घटना अतिशय दुःखद असून मी शोकाकूल कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करतो. बाबा महाकाल दिवंगत आत्म्यांना शांती आणि नातेवाईकांना हे दुःख पेलण्याची शक्ती प्रदान करो. मध्य प्रदेश सरकार मृतांच्या कुटुंबियांना ४ लाखांची आर्थिक मदत जाहीर करत आहे. तसेच जखमींवर योग्य उपचार व्हावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

पारंपारिक आयुवेर्दिक व्यवसायाला माझा पाठिंबा : ना रामदास आठवले

क्रेनच्या सहाय्याने पुष्पवृष्टी..... ना आठवले सह सर्व मान्यवरांचा सन्मान

सोलापूर/प्रतिनिधीः देशातील सर्व समाजातील घटकांना एकत्र करून त्याचे प्रश्न सोडवण्यासाठी मी संघर्ष करत आलों आहे तर देशातील वैदु समाजातील सर्व प्रश्न सोडवण्यासाठी अहोरात प्रयत्न करत आहे हा समाज आयुवेर्दिक औषधे देऊन या समाजाला एक परंपरा आहे ती परंपरा चालू ठेवावी आपण त्या समाजाला साथ देत आलो यापुढे देखील

✻ वैदु समाजाचे महामंडळ स्थापन करा.. डॉ विश्वास आरोटे

✻ स्थानिक राजकारणात स्थान केंद्रांत व राज्यात लोकसभा विधानसभा निवडणुकीत या समाजाला संधी द्याः के डी कांबळे

✻ शेजारील तेलंगणा राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रातही वैदु समाजाला आरक्षण द्या..... सिध्दार्थ कासारे

हे काम मी करणार आहेच असे मत केंद्रीय समाज कल्याण मंत्री नामदार रामदास आठवले यांनी काल सोलापूर येथे भवानी पेठ येथे डॉ स्वामी शिरकुल वैदु मित्र मंडळाने आयोजित केलेल्या सत्कार सोहळ्यात बोलताना व्यक्त केले ...यावेळी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आरपीआयचे प्रदेश अध्यक्ष राजा सरवदे होते तर व्यासपीठावर सोलापूर जिल्ह्यात केंद्रीय मंत्री नामदार रामदासजी आठवले यांच्या उपस्थितीत विशेष सन्मान व दैनिक समर्थ गांवकरी दिनदर्शिका प्रकाशन सोहळा संपन्न झाला यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉ विश्र्वासराव आरोटे यांचा भव्य दिव्य सत्कार करण्यात आला यावेळी आरपीआयचे प्रदेश अध्यक्ष राजा सरवदे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ कासारे युवक प्रदेश अध्यक्ष पप्पु कागदे प्रदेश उपाध्यक्ष डॉ स्वामी शिरकुल वैदु.प्रदेश उपाध्यक्ष के डी कांबळे धारावी झोपडपट्टी पुनर्वसन समिती अध्यक्ष संजय भालेराव..कॉंग्रेस पक्षाचे युवा नेते राजेंद्र शिरकुल चिच्चा । पान २ वर

भारत जोडो न्याय यात्रा १० मार्चला महाराष्ट्रात

नवी दिल्ली : कॉंग्रेस नेते राहुल गांधींची भारत जोडो न्याय यात्रा १० मार्चला महाराष्ट्रात दाखल होणार आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर यात्रेच्या समारोपाची मोठी सभा मुंबईत होणार आहे. सभेच्या नियोजनासाठी प्रदेश कॉंग्रेसला आवश्यक सूचना पक्षनेतृत्वाने दिल्याचे समजते. या सभेतून कॉंग्रेस लोकसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकणार आहे. नंदूरबार आणि धुळे जिल्ह्यातून प्रवेश करून १३ किंवा १४ तारखेला मुंबईत यात्रेचा समारोप होणार आहे. राहुल गांधींची भारत जोडो न्याय यात्रा विश्रांतीनंतर २ मार्चला पुन्हा सुरू होणार आहे. राजस्थानच्या ढोलपूरमधून ही यात्रा सुरू होणार आहे. पुढे मध्य प्रदेशात ही यात्रा ४ दिवस असणार आहे. ज्योतिरादित्य शिंदे यांच्या गुणा मतदारसंघातूनही ही यात्रा जाणार आहे. ७ तारखेला यात्रा पुन्हा राजस्थानमध्ये प्रवेश करेल. राजस्थानच्या बासवारा येथे एका सभेचे आयोजन करण्यात आले आहे. बासवारानंतर यात्रा गुजरातमध्ये प्रवेश करेल आणि जवळपास तीन दिवसांनी महाराष्ट्रात प्रवेश करेल.

जिल्ह्यात ग्रामपंचायत, शाळा , अंगणवाडी , आरोग्य वर्धिनी केंद्र , पशु वैद्यकीय दवाखाने माडेल करण्यासाठी प्रयत्नशिल

- मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे

सोलापूर/प्रतिनिधीः १५ वा वित्त आयोग अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये जिल्ह्यात आमचा गाव आमचा विकास चा आराखडा तयार करताना गावाच्या सर्वांगिण विकासासाठी शासनाच्या विविध योजनांच्या निधी उपलब्धतेसाठी सर्व योजनांचा कृती संगम करुन जिल्ह्याचे विभाग प्रमुख व सर्व गट विकास अधिकारी यांनी समन्वय साधणे अतिशय महत्त्वाचे आहे.शिवाय प्रत्येक तालुक्यात २ ग्रामपंचायत व जिल्ह्यात शाळा , अंगणवाडी , आरोग्य वर्धिनी केंद्र , पशु वैद्यकीय दवाखाने प्रत्येकी एक याप्रमाणे एक चांगले माडेल करण्यासाठी दक्षता घ्यावी अशा सुचना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी केली.

जिल्हा परिषदेमध्ये १५ वा वित्त आयोग अंतर्गत सन २०२४-२५ चा जिल्ह्यात आमचा गाव आमचा विकास चा आराखडा तयार करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या पूर्व नियोजन बैठकीमध्ये जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे या मार्गदर्शन करताना बोलत होत्या.यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ.सुधीर ठोंबरे , उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) । पान २ वर

मोदींच्या हस्ते तामिळनाडूत १७,३०० कोटींच्या नव्या प्रकल्पांचे भूमिपूजन; कॉंग्रेस आणि द्रमुकवर टीकास्त्र

तामिळनाडू : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (इस्रो) तामिळनाडूतील नवीन प्रक्षेपण केंद्रासह सुमारे १७ हजार ३०० कोटींच्या विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन केले. पंतप्रधान मोदींनी येथून जवळच असलेल्या कुलसेकरापट्टिनम येथे 'इस्रो'च्या होत असलेल्या नव्या प्रक्षेपण केंद्राचे भूमिपूजन केले. यासाठी सुमारे ९८६ कोटी रुपये खर्च येणार आहे. हे प्रक्षेपण केंद्र पूर्ण झाल्यानंतर येथून दर वर्षी २४ प्रक्षेपकांचे-अवकाशयानांचे प्रक्षेपण शक्य होईल.

पंतप्रधानांनी थुथुकुडी येथे विविध प्रकल्पांचे उद्घाटन केले. आपल्या तामिळनाडूच्या दोन दिवसीय दौऱ्याची सांगता करण्यापूर्वी तिरुनेलवेली येथे भाजपच्या संबोधित करताना मोदींनी तामिळनाडूतील सत्ताधारी द्रविड मुनेत्र कळघमवर (डीएमके) कडाडून टीका केली आणि केंद्राच्या योजनांमध्ये सहकार्य न केल्याचा आरोप केला. अयोध्येतील श्रीराम मंदिरावरील चर्चेदरम्यान द्रमुकने संसदेतून सभात्याग केल्याची टीकाही मोदींनी केली. मोदी म्हणाले की, द्रमुकचे सभागृहातून असे पलायन जनतेच्या श्रद्धेविषयी द्रमुकला वाटत असलेला द्वेष दर्शवते. श्रीरामाशी तामिळनाडूचे संबंध सर्वश्रुत आहे. अयोध्येतील २२ जानेवारी रोजी राम मंदिर अभिषेक सोहळ्यापूर्वी, मी तामिळनाडूतील धनुषकोडीसह विविध मंदिरांना भेट दिली. एवढ्या वर्षांनी मंदिर बांधले जात असल्याने संपूर्ण देश आनंदी होता.

उपस्थित झाला तेव्हा द्रमुकचे खासदार पळून गेले.मोदींनी सांगितले, की द्रमुक आणि कॉंग्रेस समाजात फूट पाडण्याचे काम करत आहे. आम्ही मात्र सर्व समाजाला आमच्या एका कुटुंबाप्रमाणे मानतो. 'द्रमुककडून मर्यादा उल्लंघन!' द्रमुकवर टीका करताना मोदी म्हणाले, की या पक्षाने आता सर्व मर्यादा । पान २ वर

संपादकीय

राजकारणातील कोहिनूर..

माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या निधनामुळे शिवसेनेतील पहिल्या फळीतला आणखी एक दुवा निखळला आहे. शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून मनोहर जोशी यांची ओळख होती. एका सर्वसामान्य मराठी कुटुंबातील मुलगा ते राज्याच्या राजकारणासह केंद्रात अनेक महत्त्वाची पदे भूषविलेले मनोहर जोशी यांची राजकीय कारकिर्दही मोठी होती. नगरसेवक, मुंबईचे महापौर, विरोधी पक्षनेते आणि शिवसेनेचे पहिले मुख्यमंत्री यासह त्यांनी अनेक पदे भूषवली होती. सोबतच राज्यसभा सदस्य, केंद्रात अवजड उद्योगमंत्री आणि लोकसभेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी आपल्या लक्षवेधी कार्याचा ठसा उमटवला होता. पक्षात पंत म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. बाळासाहेबांचे निकटवर्तीय असण्यासोबतच जोशी यांचे संघटन कौशल्य उत्तम होते. जोशी यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळातच एक रुपयात झुणका भाकर, मराठी चेंबर ऑफ कॉमर्सची स्थापना असे अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले गेले. मात्र, जावयाला भूखंड वाटपाच्या आरोपानंतर 'वर्षा' आणि 'मातोश्री'तील तणाव टोकाला गेला होता. त्यावेळी राज्यपालांकडे राजीनामा सुपुर्द करून मला भेटायला यावे. हा बाळासाहेबांनी एका चिठ्ठीतून पाठवलेला निरोप मिळताच क्षणाचाही विलंब न लावता जोशींनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. पद गेले परंतु त्यांची निष्ठा ढळली नाही. पुढे त्यांचा लोकसभा अध्यक्षपदापर्यंतचा प्रवासही बाळासाहेबांच्या भरभक्कम पाठिंब्याच्या जोरावरच झाला. बाळासाहेबांनी उध्दव ठाकरेंच्या हाती पक्षाची सूत्रे सोपवल्यावर नव्या पिढीतील नेते पुढे आले. जोशी सक्रिय राजकारणातून बाजूला पडले, शिवसेनेच्या जाहीर मेळाव्यात व्यासपीठावर अवमान सहन करावा लागला, तरी मनोहर जोशींनी आताच्या स्वार्थी आणि सत्तालोलूप नेत्यांप्रमाणे पक्ष बदलाचा विचार केला नाही की शिवसेना नेतृत्वावर अविश्वासही दाखवला नाही. विशेष म्हणजे जोशींनी इतर नेत्यांप्रमाणे आपल्या कुटुंबातील कुणी राजकीय उत्तराधिकारी निर्माण केला नाही. शिवसेनेचा सुवर्णकाळ अनुभवलेला हा नेता होता. शिवसेनेत उभी फूट पडल्यावर जोशी ठाकरेंच्या बाजूने की शिंदेंच्या असे प्रश्न उपस्थित होऊ लागले होते. मात्र कुणालाही न दुखावता बाळासाहेबांचा कट्टर शिवसैनिक हीच ओळख त्यांनी अखेरच्या श्वासापर्यंत जपली. सध्याच्या राजकीय वातावरणात एकमेकांवर दिवस-रात्र चिखलफेक करण्यात मग्न असलेल्या भ्रष्ट आणि दर्जाहीन नेत्यांच्या गर्दीत मनोहर जोशी यांच्यासारखा राजकारणातला कोहिनूर शिवसेनेला पुन्हा मिळणे नाही

वैशिष्ट्यपूर्ण कविता सादर करुन विद्यार्थ्यांचे कविसंमेलन रंगून बहरले

निवासी शाळा नंगपूरा मुर्री : मराठी राज्यभाषा गौरव दिन साजरा

गोंदिया : येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपुरा मुर्री या ठिकाणी आज दिनांक २७ फरवरी २०२४ रोजी दुपारी चार वाजता मराठी भाषा गौरव दिन व विद्यार्थी कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी एका मागे एक वैशिष्ट्यपूर्ण कविता सादर करण्यात आल्या व विद्यार्थ्यांचे कविसंमेलन हे रंगून बहरले.

गुपचूप मनातील
सांग तू राज ग,
प्रेमाच्या बिमारीची
दवा मला पाज ग....
तर
अस्वस्थ मनाच्या
भंगलेल्या कविता
लिहिण्यासाठी नाही
आलो पृथ्वीवर...
मी आलो
वेशीवर टांगलेल्या
अत्याचार अन्याला
घेऊन जाहीन
न्यायावर..... अशा प्रकारच्या कवितांनी कविसंमेलन रंगत आली व कविसंमेलनाया बहर आला.

यावेळी मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या मार्गदर्शनामध्ये शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती नीता भलमे यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक शिक्षिका अस्मिता तेलंग साधना पारधी, कवी व अभ्यासक मुन्नाभाई नंदागवळी अर्चना चव्हाण शीला तांडी दीक्षा तुरकर व टी आर महाजन आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी वर्ग सहा ते दहा च्या विद्यार्थ्यांनी मराठी भाषेवर, प्रेम, आई, निसर्ग, वृक्ष, महाराष्ट्र राज्य, अशा आशयासह इतरही विषयावर वेगवेगळ्या पद्धतीच्या वेगवेगळ्या स्वरूपाच्या मराठी कविता सादर केल्या. त्याचप्रमाणे उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेवर भाष्य केले.मराठी भाषेविषयीचे मार्गदर्शन केले.

सर्वांनी मराठी भाषेचे संवर्धन करा संरक्षण करा याविषयी मार्गदर्शन केले यामध्ये मराठी भाषेच्या प्रचार प्रसार त्याचप्रमाणे मराठी भाषा जगली पाहिजे मराठी भाषा टिकली पाहिजे मराठी भाषा टिकवून ठेवणे हे आपले आद्य कर्तव्य व प्रामाणिक पणे ते अस्तित्वात राहणे हे महत्त्वाचे मराठी भाषेचे भाषेचा अभिजात दर्जा जर टिकवून ठेवायचा असेल तर मराठी भाषेचे सर्व परीने गल्ली ते दिल्ली पर्यंत भाषा जगली पाहिजे भाषा टिकली पाहिजे आणि भाषा अस्तित्वात राहिली पाहिजे याविषयी सर्व मराठी अभ्यासकांनी मराठी भाषा मंडळांनी मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्या सर्व नागरिकांनी या गोष्टी आवर्जून करणे आवश्यक आहे मराठीत लिहिणारे कवी साहित्यिक लेखक कथाकार या मंडळींनी सुद्धा मराठीची जी अभिजात दर्जा आहे त्या दर्जा लक्षात घेऊन स्वतःची प्रतिभा त्या लिखाणात अवतरून त्या मराठी भाषेचा गुणगौरव झाला पाहिजे आणि मराठी भाषा अस्तित्वात असली पाहिजे एवढे मात्र करणे आवश्यक आहे.

– मुन्नाभाई नंदागवळी

मराठी भाषा मंडळ प्रमुख शालेय समिती व मराठी भाषाशिक्षक, अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपुरा मुर्री. या दरम्यान जवळपास शाळेतील २३ विद्यार्थ्यांनी कविता सादर करून कविता आणि कवितेवरचे प्रेम या ठिकाणी व्यक्त करण्यात आले. सदर कार्यक्रम अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा मुर्री जिल्हा गोंदिया येथे आयोजित करण्यात आला होता.

सर्व उपस्थित मान्यवरांची पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले आणि कार्यक्रम हा यशस्वीरित्या संपन्न करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनामिक दुर्योधन यांनी केले तर आभार सावन जाधव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व विद्यार्थ्यांनी तसेच मराठी भाषा शालेय समिती मंडळाच्या सर्व सदस्यांनी या ठिकाणी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी करण्यात आला.

जि. प. प्रशाला ईटकुर येथे राजभाषा मराठी दिनाचे औचित्य साधून शालेय वाचनालायाचे उद्घाटन

ईटकुर: सुधाकर रणदिवे, कळंब तालुक्यातील जि.प. प्रशाला ईटकुर या शाळेमध्ये वाचनालयाचे उद्घाटन मोठया थाटात संपन्न झाले.याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. आबासाहेब आडसूळ –ग्रंथपाल सार्वजनिक वाचनालय ईटकूर व

श्री.अनंत आडसूळ माजी जिल्हा संपादक दैनिक एकमत हे होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. हरिदास दादा पावलेशालेय व्यवस्थापन समिती ईटकुर हे होते. या कार्यक्रमाच्या वेळी

शिवजन्मोत्सव समिती ईटकुरचे अभयसिंह आडसूळ, जि.प.शाळेच्या केंद्रीय मुख्याध्यापिका श्रीम. मुंडे मॅडम, जनसेवा न्यूजचे अमोल रणदिवे, रितेश लगाडे, निलेश शिंदे याप्रसंगी उपस्थित होते.श्यामची आई म्हणजे संस्काराचे चालते बोलते विद्यापीठ वाचनातूनच व्यक्तिमत्त्व विकासाचा पाया रचला जातो, असे विचार अनंतदादा आडसूळ यांनी काढले. याबरोबरच शाळेसाठी त्यांनी त्यांच्याकडील १०० पुस्तके देऊ केली.

या कार्यक्रमाचे उद्घाटक आबासाहेब आडसुळ यांनी मोबाईलपासून दूर राहून पुस्तकाला वाचक भेटण्यापेक्षा वाचकाला पुस्तकांची गरज पडली पाहिजे, असे मत व्यक्त केले.तसेच त्यांनीही त्यांच्या नातीच्या वाढदिवसानिमित्त शाळेला २१०० रु. ची पुस्तके भेट देऊ असे सांगितले,शाळेचे मुख्याध्यापक श्री. गरुडे सर यांनी मान्यवरांना ग्रंथालय बद्दल माहिती दिली. सध्या ग्रंथालया

मध्ये विविध लेखकांची १५०० पुस्तके असून, वाढदिवस असो किंवा अशा विविध माध्यमातून ही पुस्तके भेट दिली जातात. अशा प्रकारचा शाळेमध्ये वाचनालयासारखा स्तुत्य उपक्रम राबविणारे शाळेचे मुख्याध्यापक तुकाराम गरुडे सर,आदर्श शिक्षक क्षीरसागर सर, आदर्श शिक्षिका श्रीम. यादव मॅडम व त्यांना सहकार्य करणारे त्यांचे सर्व सहकारी यांचे करावे तेवढे कमीच कौतुक आहे. या कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित मंडळी,सर्व शिक्षक स्टाफ, विदयार्थी, विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

डुबेरे केंद्रावरील एस.एस.सी परीक्षेची आसन व्यवस्था

सिन्नर : डुबेरे येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय डुबेरे ता – सिन्नर जि.नाशिक या विद्यालयात एस.एस.सी.परीक्षेसाठीची केंद्र आसन व्यवस्था जाहीर करण्यात आली आहे.डुबेरे केंद्र क्रमांक १५८५ असून दि.१ मार्च– २०२४ पासून सुरू होणाऱ्या परीक्षेसाठी एकूण ३६१ विद्यार्थी प्रविष्ट असून एकूण १५ वर्गखोल्या नियोजत आहे. बैठक क्रमांक – ऊे८७८०६ ते ऊे८८१६६ अशी आसनव्यवस्था सर्व विषयासाठी करण्यात आली आहे. केंद्र संचालक म्हणून मनेगाव हायस्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती सीमा हांडगे,उपकेंद्र संचालक म्हणून डुबेरे हायस्कूलचे पर्यवेक्षक रामदास वाजे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या केंद्रात डुबेरे,गोंदे , मनेगाव ,रामनगर व पाटोळे या संबंधित संलग्न शाळेतील परीक्षार्थींचा समावेश या केंद्रात आहे. परीक्षा सुरू होण्यापूर्वी वेळेत परीक्षा केंद्रात हजर रहावे. सोबत फक्त लेखन साहित्य व पाणी बॉटल आणावे. सोबत दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे आव्हान प्राचार्य किशोर जाधव,केंद्र संचालिका सीमा हांडगे, उपकेंद्र संचालक रामदास वाजे,पी. आर.करपे यांनी केले आहे.

पान १ वरुन

विविध प्रकल्प व योजनांतून देशाच्या

श्री. मोदी यांचे लक्ष्य आहे. त्यानुसार राज्याची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलरवर नेण्याचा आमचा निर्धार आहे. प्रधानमंत्री श्री. मोदी झाल्यापासून महिलांसाठी अनेक महत्वाच्या योजना सुरू झाल्या. त्यांच्या सक्षमीकरणासाठी महिला बचत गटांना हजारो कोटींचे भांडवल आणि कर्ज देण्यात आले आहे. पालकमंत्री श्री. राठोड, खा. गवळी, आमदार डॉ. धुर्वे यांचीही भाषणे झाली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रधानमंत्री श्री. मोदी यांना बंजारा समाजाची पगडी, तसेच संत ज्ञानेश्वर महाराज यांची मूर्ती देऊन स्वागत करण्यात आले.

रस्ते व महामार्गांचे लोकार्पण

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते विविध रस्ते, महत्वाकांक्षी प्रकल्पांचा शुभारंभ व लाभ वितरण झाले. त्यात वरोरा – वणी महामार्गावरील १८ कि.मी. चौपदरीकरणामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्गुस, वणी, तडाळी, पडोळी यांसारख्या विविध औद्योगिक क्षेत्रांना फायदा मिळेल. सुमारे ३७८ कोटी रू. निधीतून सलाईखुर्द – तिरोरा महामार्गावरील ४२ कि.मी. काँक्रिटीकरणामुळे गोंदिया ते नागपूर प्रवासाच्या वेळेत एक तासाची कपात होऊन नागझिरा अभयारण्याच्या पर्यटनाला चालना मिळेल. सुमारे २९१ कोटी रू. निधीतून साकोली – भंडारा जिल्हा सीमेपर्यंतच्या ५५.८० कि.मी. दुपदरी रस्त्याचेही लोकार्पण झाले.

सिंचन प्रकल्प

पंतप्रधान कृषी सिंचन योजनेंतर्गत १ हजार ६८३ कोटी रू. निधीतून विदर्भ आणि मराठवाड्यातील ६ प्रकल्पांचे लोकार्पण झाले. या प्रकल्पातून २.४१ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत १ हजार १८० कोटी रू. निधीतून विदर्भ आणि मराठवाड्यातील ४५ सिंचन प्रकल्पांमुळे ५१ हजार हेक्टरची सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

रेल्वेसेवेचा शुभारंभ

अहमदनगर – बीड–परळी रेल्वे मार्गावर ६४५ कोटी रू. निधीतून न्यू आष्टी – अंमळनेर टप्प्याचे व अंमळनेर – न्यू आष्टी स्टेशनपर्यंत विस्तारित रेल्वे सेवेचा शुभारंभ झाला. त्याचा लाभ बीड जिल्ह्यातील नागरिक व कामगार वर्गाला मिळेल. सुमारे ६७५ कोटी रू. निधीतून वर्धा–यवतमाळ–नांदेड रेल्वे मार्गावरील वर्धा –कळंब या टप्प्याचे लोकार्पण व नवीन रेल्वे गाडीचा शुभारंभ झाला. त्यामुळे वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यांतील दळणवळण गतिशील होईल. यवतमाळ जिल्ह्यात प्रथमच ब्रॉडगेज रेल्वे सेवा सुरू झाली आहे.

महिला सशक्तीकरण अभियान

मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान अंतर्गत ५.५० लाख महिला बचत गटांना ८२५ रू. कोटी फिरत्या निधीचे वितरण करण्यात आले. स्वयंसहाय्यता समूहांना अतिरिक्त खेळते भांडवल देण्यासाठी ९१३ कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात आली. आयुष्मान भारत अंतर्गत महाराष्ट्रात १ कोटी आयुष्मान कार्डचे वितरण होत असून, योजनेच्या ३ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात कार्डचे वितरण करण्यात आले. इतर मागास प्रवर्गासाठी मोदी आवास योजनेचा शुभारंभही झाला. त्यात येत्या ३ वर्षात १० लाख घरे बांधण्यात येणार असून, २.५ लाख लाभार्थ्यांना रु. ३७५ कोटींच्या पहिल्या हप्त्याचे ऑनलाईन वितरण करण्यात आले.

पीएम किसान सन्मान निधीचा १६ वा हप्ता थेट बँक खात्यात

पीएम किसान सन्मान निधीच्या १६ व्या हप्त्याचे थेट बँक खात्यात वितरित झाले. देशातील ९ कोटी शेतकरी कुटुंबांना एकूण २१ हजार कोटी रुपयांचे, तसेच राज्यातील सुमारे ८८ लाख शेतकरी कुटुंबांना १ हजार ९६९ कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले. आधार लिंक बँक खात्यात लाभांचे डिजिटल हस्तांतरण करण्यात आले. नमो शेतकरी महासन्मान निधीअंतर्गत दुसऱ्या आणि तिसऱ्या हप्त्याचे वितरण करण्यात आले. त्यात राज्यातील सुमारे ८८ लाख शेतकरी कुटुंबांना ३ हजार ८०० कोटी रुपयांचा लाभ मिळाला.

पारंपारिक आयुवेर्दिक व्यवसायाला

वरवंटी यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते यावेळी ना रामदास आठवले यांचे जंगी स्वागत करण्यात आले विशेष याठिकाणी क्रेनच्या सहाय्याने बनविलेला भव्यदिव्य हार घालून सत्कार करण्यात आला हा सत्कार म्हणजे या समाजातील प्रश्न सोडवण्यासाठी साकडं घातलं आहे ते मी सोडवण्यासाठी राजा सरवदे सिध्दार्थ कासारे के डी कांबळे पत्रकार डॉ विश्र्वास आरोटे यांच्या शिष्टमंडळाने मुंबईत शिष्टमंडळाने येवून सोलापूर येथील जागेवर या समाजाला घरकुल योजनेचा लाभ देण्यात येईल तर देशातील वैदु समाजातील प्रश्न डॉ स्वामी शिरकुल वैदु यांच्या मार्गदर्शनाखाली सोडवण्यासाठी प्रयत्न केला जाईल..... आजच्या सत्काराने माजी जबाबदारी वाढली आहे संपुर्ण देशात संविधान सोहळा संपन्न होत आहे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानावर संपुर्ण देश सुरक्षित आहे.....तर ना रामदास आठवले यांचे आगमन होताच फटाक्यांची आतिषबाजी व ढोल ताशा पथक स्वागत करण्यात आले संपुर्ण देशाला गवसणी घालणार हा सत्कार सोलापूर वासियांना मनात स्मृति देणारा ठरेल यावेळी ना आठवले यांनी प्रत्येकाची चौकशी करत महिलांकडून प्रश्न विचारत आता अबकी बार ४०० पार करून वैदू समाजाचा विकास हाच माझा ध्यास असा नारा दिला तर सिध्दार्थ कासारे यांनी बोलताना सांगितले की उपेक्षित वंचित समाजासाठी कायम ना आठवले हे पाठीशी असल्यामुळे दिन दुबळ्यांचा कैवारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न आम्ही कार्यकते करत आहेत येथिल समाजातील नव्हे तर संपूर्ण राज्यात हा समाज वसलेला आहे आजही मुंबई नगरीत या समाजाला संरक्षण देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहे तर देशातील वैदु समाजातील घटकांना इतर राज्यांच्या प्रमाणे सवलती द्याव्यात यासाठी तेथील जी आर येवून देशाचे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्याकडुन फक्त ना आठवले साहेब करु शकतात ते करुन घेण्यासाठी स्वामी शिरकुल वैदु यांच्या मार्गदर्शनाखाली ते लवकरच करु..यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ विश्र्वास आरोटे यांनी वैदु समाजातील अनेक तरुण शिक्षण घेवून शासकीय नोकरी मध्ये आहे या समाजातील जात पंचायत बंद करून मढी येथे राज्य शासनाच्या महात्मा गांधी तंटामुक्त अभियान सुरू केले त्यामुळे या समाजातील लोकांवर अन्याय होत नाही तर जुन्या रूढी परंपरा चालू ठेवुन राज्यात हा समाज वेगवेगळ्या व्यावसायिक बनला आहे तर या समाजातील तरुणांना विविध पक्षाकडून निवडणूक काळात मतांसाठी वापर करून घेतला जातो मात्र हा समाज वचनपूर्ती करणारा समाज आहे. या समाजाला स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये महत्व दिले जाते पण राज्यात आमदार खासदार किंवा या समाजाचे महामंडळ स्थापन करण्यात येवुन त्यांना उभे करण्यात ना आठवले हेच करूंन दाखवतील विचार बदला संघटीत बना निवडणूक काळात मतांसाठी वापर करून घेवून चेरीमेरी देवुन हित साधणारे ढोंगी लोकांना आता जागा दाखवून द्या असे आवाहन डॉ विश्र्वास आरोटे यांनी व्यक्त केले तर धारावी झोपडपट्टी पुनर्वसन समिती अध्यक्ष संजय भालेराव यांनी शाहू फुले आंबेडकर यांच्या विचारांवर चला आपला विकास हा फक्त एकत्र आलो तर कोणीच रोखू शकत नाही तर आपला उपयोग कोणाला करून देवु नका आता या समाजाला उज्वल यश मिळेल जोपर्यंत तुम्ही एकीचं दर्शन दाखविणार नाही तोपर्यंत तुम्हाला काही साध्य करता येणार नाही शिक्षण आरोग्य या विषयावर समाज प्रबोधन तुमच्या समाजात झाले म्हणून तर राज्यातील वैदु समाजातील प्रत्येक पक्षाला दखल घ्यावी लागते...असे मत भालेराव यांनी व्यक्त केले तर यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ स्वामी शिरकुल वैदु यांनी केले तर सूत्रसंचालन प्रदेश उपाध्यक्ष के डी कांबळे यांनी तर आभारप्रदर्शन युवा नेते राजेंद्र शिरकुल यांनी मानले

मोदींच्या हस्ते तामिळनाडूत १७,३००

ओलांडल्या आहेत. तामिळनाडूतील इस्रो प्रक्षेपण केंद्राचे श्रेय घेण्यासाठी त्यांनी चीनचे 'स्टिकर' लावले. हा आपल्या देशाचा अपमान आहे, आपल्या देशभक्त अवकाश शास्त्रज्ञांचा अपमान आहे. तामिळनाडूचे लोक द्रमुकला याची नक्की शिक्षा देतील. भाजपच्या तामिळनाडू शाखेने आरोप केला, की, कुलसेकरापट्टिनम येथील 'इस्रो'च्या नवीन केंद्राचे श्रेय घेण्यासाठी द्रमुकने एका जाहिरातीत चिनी ध्वजाचा आणि चीनी भाषाचा वापरली आहे. हा संदर्भ घेत मोदींनी आरोप केला, की द्रमुक भारताच्या प्रगतीचे आणि अवकाश तंत्रज्ञानातील देशाच्या कामगिरीची प्रशंसा करायला तयार नाही. ही जाहिरात जनतेने भरलेल्या करातून दिली आहे. त्यात भारताच्या अवकाश क्षेत्रातील यशाचा उल्लेख नाही. त्यांना हे यश जगाला ठळकपणे दाखवायचे नाही. दरम्यान, द्रमुकच्या उपसरचिटणीस कनिमोळी यांनी सांगितले की, 'इस्रो'चे नवीन प्रक्षेपण केंद्र योजना द्रमुकने गेल्या दहा वर्षांत विकासासाठी सातत्याने केलेल्या प्रयत्नांचे फलित आहे.

जिल्ह्यात ग्रामपंचायत, शाळा ..

इशाधीन शेळकंदे ,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अमोल जाधव , बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी , नरेंद्र खराडे , महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले , जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले ,पशुसंवर्धन अधिकारी डॉ.नरळे, लपाचे कार्यकारी अभियंता पारसे , दक्षिण सोलापूरचे गट विकास अधिकारी बाळासाहेब वाघ , मोहोळचे आनंद मिरगणे, अक्कलकोटचे सचिन खुडे , बार्शीचे माणिकराव बिचुकले , माळशिरसचे विनायक गुळवे , ग्रामपंचायतचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी झेड.ए.शेख आदी उपस्थित होते.

आमचा गाव आमचा विकासचा आराखडा तयार करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या पूर्व नियोजन बैठकीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी आव्हाळे यांनी आराखडा तयार करताना गावात पूर्वी केलेली कामे , खर्च झालेला निधी याबाबत काळजी घेणे गरजेचे आहे.शिवाय यावर्षीच्या आराखडा तयार करताना इतर योजनांचा निधी तसेच सीएसआर फंड उपलब्धतेसाठी सर्व विभाग प्रमुख व गट विकास अधिकारी यांच्यामध्ये समन्वय असायला हवा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

आगामी वर्षात खालील तालुक्यात एक माडेल काम करण्यासाठी नियोजन करण्यात आले. दक्षिण सोलापूर – अंगणवाडी , मोहोळ – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा , माळशिरस – स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) – २ अंतर्गत कामे , बार्शी – पशुसंवर्धन दवाखाना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) – १ ग्रामपंचायत तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात २ ग्रामपंचायत माडेल करणे

मराठा आंदोलन ३ मार्चपर्यंत स्थगित;

पोलिसांना विनंती आहे की, ते मंडप काढू नयेत आणि गावकऱ्यांवरील दडपशाही बंद करण्यात यावी. आजपासून दडपशाही रोखण्यासाठी करोडो मराठ्यांनी राष्ट्रपती, राज्यपाल यांना ई–मेल करावे. सरकारच्या वेबसाईटवर ई–मेल करावे, असे आवाहन देखील जरांगे यांनी केले आहे.

ओबीसीतून आरक्षणाच्या मागणीवर ठाम जरांगे–पाटील म्हणाले की, मी १० टक्के आरक्षण स्वीकारणार नाही, अटक करून जेलमध्ये टाकले तरी मी जेलमध्ये देखील आमरण उपोषण करेन. ओबीसीतून आरक्षण घेतल्याशिवाय मागे हटणार नाही. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून जातीय द्वेष सुरू आहे. मी बोललो देवेंद्र फडणवीस यांना, मात्र याचा राग मराठ्यांच्या नेत्यांना आला. मराठा नेत्यांना जात की नेता हवा आहे, असा प्रश्न जरांगे–पाटील यांनी उपस्थित केला. जातीने मतदान केले म्हणून तुम्हाला नेत्यांनी जवळ केले. तुमच्या स्वार्थासाठी मराठ्यांचे नुकसान करू नका. यांनी मला अटक केली तरीही मराठा समाजाने शांततेत आंदोलन करावे, असेही जरांगे म्हणाले. यावेळी ते म्हणाले, सरकारने ज्यांच्या नोंदी सापडल्या त्यांचेही कुणबी प्रमाणपत्रे वाटप करण्याचे बंद केले आहे. उच्च न्यायालयाची तारीख ३ मार्च असताना अलीकडे घेतली

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

नाशिक जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळामधील कर्मचार्यांची वैद्यकीय बिलांना मंजुरी

नाशिक जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील १२५५ कर्मचाऱ्यांची ठे.१३९१८४०७०/- १३ कोटी ९१ लाख ८४ हजार ७० वैद्यकीय बिलांना मंजुरी देऊन बिलांची रक्कम शाळा मुख्याध्यापकांच्या खात्यावर वर्ग**

निफाड : नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी दि. २७।०२। २४ रोजी मा. शिक्षक आमदार किशोर दराडे यांचे समवेत सभा घेऊन शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पेंडिग वैद्यकीय बिलांबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली असून संबंधित अधिकाऱ्यांशीही त्याबाबत चर्चा करण्यात आली व त्याचाच परिपाक म्हणून .प्रविण पाटील शिक्षणाधिकारी माध्यमिक तसेच नितीन पाटील अधीक्षक वेतन पथक, नाशिक, चौधरी व इतर वेतन पथक कर्मचारी या सर्वांच्या सहकार्यातून नाशिक जिल्ह्यातील एकूण १२५५ शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे ठी. १३९१८४०७०/ रकमेचे वैद्यकीय बिले मंजूर करण्यात येऊन दि. २७ ख २ श्र २०२४ रोजी मंजूर रक्कम शाळा मुख्याध्यापकांच्या संयुक्त खात्यावर वर्ग करण्यात आली आहेत. त्याबद्दल मा. शिक्षण अधिकारी माध्यमिक वि. व मा. अधिक्षक वेतन पथक

नाशिक यांचे नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव एस. बी. देशमुख यांनी व उपाध्यक्ष प्रदीप सागळे, डॉ. अनिल माळी, एम.डी.काळे, आर. बी. एरंडे यांनी आभार मानले.

बाकी राहिलेली फरक सर्व बिले मंजूर करण्याची सूचना व शिक्षकांच्या खाती जमा करण्याची सूचना मुख्याध्यापक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. सात मार्च पर्यंत हे पैसे जमा न झाल्यास सात मार्चपासून शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांच्या दालना समोर उपोषण करण्याचा इशारा शिक्षक आमदार किशोरभाऊ दराडे मुख्याध्यापक संघाचे सचिव एस. बी. देशमुख यांनी दिला.

नवीन प्रशासकीय इमारतीत शासकीय कार्यालये स्थलांतरित करा

आमदार संजय जगताप यांची विधानसभेत मागणी

पुरंदर : पुरंदर तालुक्यात बांधण्यात आलेल्या नवीन प्रशासकीय इमारतीत, तालुक्यातील विविध शासकीय कार्यालये स्थलांतरित करा ,यासह पुरंदर तालुक्यात चारा डेपो व विविध विषयात मदत करण्या यावी, अशी मागणी मागणी पुरंदर हवेली चे लोकप्रतिनिधी आमदार संजय जगताप यांनी, दि. २७ फेब्रुवारी रोजी विधान सभेत पुरवणी मागण्यात बोलताना केली,

याबाबत बोलताना आमदार संजय जगताप म्हणाले की, पुरंदर तालुक्यातील प्रशासकीय इमारतीचे काम हे १५ ऑगस्ट रोजी पुर्ण झाले होते, त्यामुळे पुरंदर तालुक्यातील तहसिल कार्यालय, प्रांत कार्यालय व इतर प्रशासकीय कार्यालये ही नवीन प्रशासकीय इमारतीत स्थलांतरित करण्याबाबत पालकमंत्री , महसूल मंत्री , व जिल्हाधिकारी यांच्याकडे वेळोवेळी मागणी केली होती, याबाबत पालकमंत्री व महसुलमंत्री यांनी सुचना करुनही गेल्या ७ महिण्यात यावर कोणतीही कारवाई केली गेली नाही.

मध्यंतरी ३०० वर्षापुर्वीच्या जुण्या ऐतिहासिक वास्तुमध्ये असलेल्या पुरंदर तहसिल कार्यालयातुन ईव्हीएम मशीनचा सीपीयु चोरोला गेला, याप्रकरणी पुरंदचे तहसिलदार , उपविभागीय अधिकारी तथा प्रांत पुरंदर, उपविभागीय पोलिस अधिकारी भोर विभाग व सासवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांचे निलंबन झाले आहे, नवीन प्रशासकीय इमारतीचे काम पूर्ण झाले असताना , ही कार्यालये का? स्थलांतरित केली नाहीत हा प्रश्न उपस्थित करीत, महसुल मंत्र्यांनी तात्काळ नवीन प्रशासकीय इमारतीत प्रशासकीय कार्यालयाचे कामकाज सुरु करण्याबाबतचे आदेश देण्याची मागणी आमदार संजय जगताप यांनी केली. पुरंदर तालुक्यातील भिषण दुष्काळी परिस्थिती असल्याने , जनावरांसाठी चारा छावण्या पाण्याचे टँकर, भरण्यासाठी जवळच्या ठिकाणी व्यवस्था करावी, तसेच जनावरांसाठी रेशनिंग दुकानात पशुखाद्य देण्याची व्यवस्था करण्यात यावी, भीषण दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तोडू नये जेणेकरून सद्याच्या भीषण दुष्काळी परिस्थितीत जनावरांच्या चारापाण्यासाठी व नागरीकांना शिल्लक पाण्याचा वापर करता येईल , त्यामुळे या परिस्थितीत शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तोडू नये, असे ही आमदार संजय जगताप म्हणाले, मतदार संघातील शेतकरी नागरीकांच्या सोयीसाठी पाणंद रस्ते करताना रोजगार हमीवर काम करण्यासाठी मनुष्यबळ मिळत नाही, त्यामुळे यासाठी यांत्रिकरणाच्या वाफराची परवानगी देण्यात यावी , व पीएम आरडी प्रमाणे, ग्रामीन भागात वनविभागात रस्ते तयार झाल्यास नागरीकांना दळवळण करणे सुलभ होईल त्यामुळे तसाही विचार करण्यात यावा अशी मागणी आमदार संजय जगताप यांनी केली, नवीन प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण सोहळा करण्यात यावा याबाबत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेड व बहूजन सामाजिक विकास प्रतिष्ठान यांच्या वतीने सदर प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण सोहळा करुन, तहसिल कार्यालयासह संभाव्ये इतर प्रशासकीय कार्यालये सदर इमारतीत स्थलांतरित करण्यात यावीत याबाबत पालकमंत्री यासह वरीष्ठ अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करुन या मागणीसाठी पुरंदरच्या तहसिल कार्यालयासमोर जाहीर जागरण गोंधळ आंदोलन केले होते, त्यामुळे पुरंदर हवेलीचे लोकप्रतिनिधी आमदार संजय जगताप यांनी , ही मागणी सभागृहात मांडल्याने , व नवीन प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण सोहळा लवकर पार पडून सदर प्रशासकीय इमारतीत संभाव्ये प्रशासकीय कार्यालयाचे काम सुरु होण्याचा मार्ग मोकळा झाल्याने, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेड व बहूजन सामाजिक विकास प्रतिष्ठान पुणे यांच्या सर्व पदाधिकारी यांनी आमदार संजय जगताप यांचे आभार व्यक्त केले आहेत,

मंगळवेढा उपसा सिंचन संत चोखामेळा व महात्मा बसवेश्वराच्या स्मारकासाठी एकही रुपयाचा निधी उपलब्ध करून दिला नाही हीच शोकांतिका : अभिजीत पाटील

हा अर्थसंकल्प बजेट म्हणजे नागरिकांना गाजर दिल्याचा प्रकार आहे. सोलापूर विमानतळासाठी लगची कारखान्याची चिमणी पाडून देखील निधीची घोषणा केली नाही हि खेदाची बाब आहे. तसेच माझ्या पंढरपूर मंगळवेढ्यातील उपसा सिंचन योजनेसाठी गेल्या दोन वर्षांपूर्वी अत्यावश्यक तरतूद करून देण्याची घोषणा केली महात्मा संत बसवेश्वरांचे स्मारक व संत चोखामेळा यांच्या स्मारकासाठी देखील निधी उपलब्ध करून देण्याचे तत्कालीन अर्थमंत्री यांनी घोषणा केली होती परंतू निधीच दिला नसल्याने कोणतेही काम झालेच नाही. पंढरपूर मंगळवेढ्याचे आमदार हे भाजपचे असून रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून दिला म्हणजे बोळवण केल्याचा आरोप अभिजीत पाटील यांनी केला आहे.

अभिजीत पाटील, चेअरमन श्री विठ्ठल सह.साखर

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री.अभिजीत पाटील यांच्या वतीने 'बजेट पे चर्चा' अर्थात महाराष्ट्र राज्याचा अंतरिम अर्थसंकल्पाचे थेट प्रक्षेपण डीव्हीपी स्क्वेअर, पंढरपूर येथे पंढरपूर मंगळवेढा येथील मान्यवरांसोबत पार पडले

पुढील निवडणुकांच्या अनुषंगाने नागरिकांची दिशाभूल करत केवळ गाजर दाखविणारा हा अर्थसंकल्प आहे. या बजेटमध्ये सर्वसामान्य नागरिक, शेतकरी त्यांच्यासाठी कोणत्याही ठोस उपाययोजना दिसत नाही.अर्थसंकल्पाच्या नावाखाली सरकारने ९ हजार कोटी महसुली तुटीचे बजेट मांडले आहे.. यापूर्वी देखील अशाच प्रकारे १७ हजार कोटी तुटीचा अर्थसंकल्प मांडला गेला.. आधीच्या कामांचे आणि घोषणांचे काय झाले? किती कामे पूर्णत्वास गेली? याचा आधी शासनाने खुलासा केला पाहिजे..

कुठलेही आर्थिक नियोजन नसताना केवळ पुढील काळात येणाऱ्या निवडणुका बघून लोकांच्या

भावनांशी खेळण्याचे काम राज्य सरकारने केले आहे, असाच एकूण निष्कर्ष या अर्थसंकल्पाकडे बघून काढावा लागतो असे मत श्री.अभिजीत पाटील यांनी मांडले.

यावेळी पंढरपूर मा.नगराध्यक्ष सुभाष भोसले, काँग्रेसचे नेते, देवानंद गुंड पाटील, विठ्ठल सुतगिरणीचे चेअरमन दिनकर पाटील, राजेंद्र मोरे महाराज मा.नगरसेवक आदित्य फत्तेपूरकर, पंकज देवकते, शिवसेना (उबाठा) रणजीत बागल, कर सल्लागार विश्वंभर पाटील, केदार कटेकर, उद्योजक यश उत्पाद, तुकाराम मस्के, राधेश बादले पाटील, सप्तसुंगी बँकेचे अमोल चव्हाण, गणेश बागल, प्रविण पाटील, शहराध्यक्ष चंद्रशेखर कोंडुभैरी, कार्याध्यक्ष मुझमिल काझी, पत्रकार प्रशांत मोरे, समाधान गाजरे, ड. संजय रोंगे, किरण घोडके, संदेश दोशी, क्सिस बँकेचे विशाल साळुंखे, विद्यार्थिनी कोमल कौंडूभैरी, ऋतुजा फाळके, अक्षता धनवडे, मृण्मयी कोळसे, अहरम वाघमारे, नितीन पारसे, जमीर शेख यासह विविध क्षेत्रातील प्रसिद्ध उद्योजक, लघुउद्योजक, डॉक्टर, सी.ए., सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात कार्यरत असलेली मंडळी, विद्यार्थी, विविध क्षेत्रातील तज्ञ व नागरिक उपस्थित होते.

कुसुमाग्रजांनी मराठी भाषेला समृद्ध केले : साहित्यिक महादेव घोंगडे

पंढरपूर/प्रतिनिधीः 'कुसुमाग्रजांनी निर्माण केलेल्या साहित्यामध्ये एक प्रकारची वेगळी ताकद व प्रेरणा असल्यामुळे मराठी साहित्य क्षेत्रात साहित्यिक व कवी कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांचे नाव अग्रस्थानी घेतले जाते. मानवी भावना साहित्याच्या रूपाने किती प्रकाराने फुलू शकते हे वि. वा. शिरवाडकर यांनी दाखवून दिले. म्हणून खऱ्या अर्थाने कुसुमाग्रज यांनी मराठी भाषेला समृद्ध केले.' असे प्रतिपादन जेष्ठ साहित्यिक महादेव घोंगडे यांनी केले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटमध्ये स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज प्रा. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीत 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी जेष्ठ साहित्यिक व सेवानिवृत्त शिक्षक महादेव घोंगडे हे मार्गदर्शन करत होते. प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणतज्ञ डॉ. मोहन देशपांडे हे उपस्थित होते. प्रथम पाहुण्यांच्या हस्ते कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. स्वेरीचे सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी प्रास्ताविकात 'मराठी भाषा गौरव दिना'चे महत्व स्पष्ट करताना 'कुसुमाग्रजांच्या मराठीतील साहित्यामुळे महाराष्ट्रातच नव्हे तर भारताबाहेर देखील मराठी भाषेला महत्व प्राप्त झाले आहे. कुसुमाग्रजांनी आपल्या साहित्यातील लेखनातून मराठी भाषेला जागतिक स्तरावर पोहचवण्याचे कार्य केले आहे. आज मातृभाषेमुळेच भाषेची गोडी निर्माण होवून मनातील भावना अधिक उत्कटपणे व्यक्त करता येतात.' असे सांगितले.

प्रमुख अतिथी शिक्षणतज्ञ डॉ. मोहन देशपांडे म्हणाले की, 'सध्या सर्वत्र इंग्रजी भाषेचे लोण पसरले असले तरी महाराष्ट्रात मराठी भाषेतूनच आपले विचार अधिक प्रभावीपणे प्रकट करता येतात.

ग्लोबल लेवलवर काम करताना आपल्याला काही ठिकाणी मातृभाषेचा आदर हा राखलाच पाहिजे.' असे सांगून त्यांनी कुसुमाग्रज यांनी 'कणा' सारख्या कवितेत असणारी लयबद्ध रचना, दुर्दम्य आशावाद याचे महत्व सांगितले. यावेळी डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मनियार, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतिश मांडवे, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. श्रीकृष्ण भोसले, प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.सतीश लेंडवे, रजिस्ट्रार राजेंद्र झरकर, प्रा.राहुल नागणे, प्रा. अविनाश कोकरे, प्रा. प्राजक्ता जामदार, प्रा.प्रज्ञा होनमुटे, प्रा.चैताली अभंगराव, प्रा. सारिका हजारे, प्रा. संजय मोरे, प्रा.सचिन काळे, प्रा. सचिन खोमणे, प्रा.प्रसाद बाबर, प्रा. दीपक भोसले, इतर प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी आदी उपस्थित होते. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. नीता कुलकर्णी यांनी आभार मानले.

नळदुर्ग येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथे जिल्हा परिषद कन्या प्रशालेत शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षणातील शिक्षकांच्या वतीने कवी श्रेष्ठ कुसुमाग्रज तथा वि . वा .शिरवाडकर यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला .विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचे महाराष्ट्राच्या साहित्यिक , सांस्कृतिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय योगदान आहे .एक आधुनिक श्रेष्ठ मराठी कवी , नाटककार ,कादंबरीकार , म्हणून त्यांची ख्याती आहे . 'कुसुमाग्रज 'या टोपण नावाने त्यांनी लेखन केले .प्रसिद्ध साहित्यिक वि .स . खांडेकरांनंतर मराठी साहित्याला ज्ञानपीठ पुरस्कार मिळवून देणारे कुसुमाग्रज हे दुसरे साहित्यिक म्हणून ओळखले जातात .मराठी साहित्यामध्ये विपुल लेखन करून साहित्याचे दालन अधिक समृद्ध करणारे कुसुमाग्रज यांचा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो . याचाच भाग म्हणून नळदुर्ग येथे शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण समारोप व मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रम घेण्यात आला . प्रारंभी कवी श्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जवाहर विद्यालयाचे उपप्राचार्य गोपाळ कुलकर्णी जि .प . कन्या प्रशालाचे मुख्याध्यापक कमलाकर गायकवाड यांची उपस्थिती होती . यावेळी शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षणातील सुलभक प्रा . डॉ .प्रशांत भागवत , शिवशंकर जळकुटे ,दत्ता राऊत , प्रा .बालाजी गायकवाड , भारत जाधवर , बाबासाहेब अंकुशे ,तंत्रस्नेही विजयकुमार मर्डे , सहनियंत्रक सत्तेश्वर जाधव ,यांचा भैरवनाथ कानडे लिखित नोबेल विजेते भारतीय हे पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन प्रशिक्षणार्थींच्या वतीने सत्कार करण्यात आला .याप्रसंगी मराठी भाषा गौरव दिन व कुसुमाग्रज यांच्या जीवन कार्यावर ज्येष्ठ मराठी विषय शिक्षक शिवशंकर जळकोटे प्रा . डॉ .प्रशांत भागवत यांनी मनोगत व्यक्त केले .या कार्यक्रमाचे प्रास्ताविक धाराशिव जिल्हा मराठी भाषा समितीचे सदस्य भैरवनाथ कानडे यांनी तर सूत्रसंचालन प्रविण गुरव व आभार कमलाकर वाघमारे यांनी मानले .कार्यक्रमास मकरंद पाटील , सुभाष गळाकाटे , प्रदीप तलमोडे ,महादेव बागडे ,प्रदीप बिराजदार , आदींसह शिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते .

'दैनंदिन जीवनात विज्ञानाचा उपयोग करावा : प्राचार्य किशोर जाधव

डुबेरे येथील जनता विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

सिन्नर : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला.अध्यक्षस्थानी प्राचार्य किशोर जाधव होते.व्यासपीठावर विद्यालयाचे पर्यवेक्षक रामदास वाजे, विज्ञान विषयाचे शिक्षक पी.आर.करपे, कांगणे, भारती निखाडे, गणेश ढोणे,एस.के.

पगार ,सिद्दी आहेर, सोमनाथ गिरी,डी.एच.जाधव, राजेंद्र गांगुर्डेआदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विज्ञान विषय शिकविणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यात आला. पायल पावसे हिने विज्ञान विषयक कविता सादर केल्या. रमण यांच्या जीवन व कार्याविषयी जेष्ठ विज्ञान पी.आर.करपे यांच्यासह तन्वी कुटे,सानिका सदगीर,विद्या निमसे,आदित्य वाजे या विद्यार्थ्यांनी करून दिला. विज्ञानशिक्षक पी.आर.करपे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता नववी तु-ब च्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रम सादर

केला.दिव्या शिंदे,वैष्णवी जाधव, चैताली सदगीर ,संस्कृती वाघ,नियती वाघ,अक्षय वाजे या विद्यार्थ्यांनी यज्ञ पेटविणे,नारळातुन विविध वस्तू काढणे, आम्ल व आम्लारीचे फुग्याद्वारे विविध प्रयोग, नेलपेंटचे दुष्परिणाम ,भोंदूबाबाची फसवेगिरी ,भेसळीचे दुष्परिणाम आदींसह विविध प्रयोग करून दाखविले.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य किशोर जाधव म्हणाले की,विज्ञान हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे.विद्यार्थ्यांनी अंधश्रद्धेच्या आहारी न जाता प्रत्येक घटनेमागील कारण जाणून घेतले पाहिजे. विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकार केला पाहिजे . दैनंदिन जीवनात विज्ञानाचा उपयोग करावा असे आव्हान जाधव यांनी शेवटी केले . ऋतुजा वामने व श्रावणी वाघ यांनी सूत्रसंचालन केले तर आभार पर्यवेक्षक रामदास वाजे यांनी मानले. यावेळी विद्यार्थी, शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

पंढरपूर/प्रतिनिधीः केंद्रीय वित्त राज्यमंत्री (भारत सरकार) डॉ. भागवत कराड यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.याप्रसंगी माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्यासह मान्यवर पदाधिकारी व मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते.

महिलांनी या युगामध्ये स्वावलंबी होणेच गरजेचे : आ. शिंदे

दुधनी येथे हळदी-कुंकू कार्यक्रम व शांभवी गारमेंटस उद्योग समुहाचा शुभारंभ

दुधनी/प्रतिनिधीः महिला असुरक्षित झाल्या आहेत.प्रत्येक स्तरावर अपयशी ठरलेल्या घराघराची आर्थिक घडी विस्कटली आहे.यावर प्रत्येक घरातील महिलांनी विचार करावा असे मत आमदार प्रणिती शिंदे यांनी केले अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे शांभवी फाऊंडेशनकडुन शांभवी गारमेंटस उद्योग समुहाचा शुभारंभ व हळदी कुंकू कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे होते. यावेळी मंचावर आमदार काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे, संस्थापक फाऊंडेशनच्या अध्यक्षा वैशाली म्हेत्रे, चंद्रकांत लोंढे, अन्नपुर्णा म्हेत्रे, माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे, ऐश्र्वर्या म्हेत्रे, प्रेमा ढंगे, गुरुदेवी सालक्की, सुभाष परमशेट्टी, गुरुशांत धल्लु, गुरुशांत परमशेट्टी, बसवणप्पा धल्लु, शेखर दोशी, शरणगौड पाटील, गुरू हबशी आदी उपस्थित होते.

शांभवी फाऊंडेशनकडुन महिलांना स्वावलंबन : वैशाली म्हेत्रे (अध्यक्षा-शांभवी फाऊंडेशन)

शांभवी फाऊंडेशनकडुन महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी विविध मार्गाने प्रयत्न सुरू आहेत.याचाच भाग म्हणून रविवारी ५० मशिनरीच्या माध्यमातून गारमेंटस सुरू केले आहे.भविष्यात मार्गदर्शन शिबीरे आयोजित करणार आहोत.

उपस्थितांचे स्वागत करत संस्थेचे खजिनदार कोमल म्हेत्रे यांनी प्रास्ताविक केले.पुढे बोलताना प्रणिती शिंदे म्हणाले की, दुधनी व परिसरातील शेकडो महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी शांभवी फाऊंडेशनकडुन शिलाई गारमेंटस उभारले आहे. ही बाब आदर्शवत आहे. यातुन मोठ्या प्रमाणावर रोजगार प्राप्त होणार आहे. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी महिलांशिवाय समाजाची व्याख्या अधुरे असल्याचे सांगितले. सुत्रसंचलन आश्र्विनी येरटे यांनी तर आभार सोनाली चिंचोळी यांनी मानले.

अंभई, आत्मा मालिक शाळेत मराठी साहित्याचा जागर

वाडा : जेष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी राजभाषा गौरव हा दिवस विश्र्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट अंतर्गत कार्यरत असलेल्या आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुल अंभई येथे ग्रंथालय विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने समता सांस्कृतिक मंचने मराठी साहित्य जागर कार्यक्रम सादर केला.

यावेळी समता सांस्कृतिक मंचचे प्रमुख शैलेश दोंदे यांनी प्रास्तविक सादर केले. तर समता सांस्कृतिक मंच समन्वयक सुरेखा पैठणे ,मिलिंद जाधव , अक्षय भोईर यांनी मराठी दिवसाचे महत्त्व सांगून कुसुमाग्रज यांच्या कविता सादर करून कवितेचे महत्त्व, लेखक, मराठी साहित्य याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत कवितेतून प्रबोधन केले.

शिक्षक भगवान भोईर यांनी मराठी भाषा कशा प्रकारे टिकवावी याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी संत तुकाराम महाराज व सावित्रीबाई फूले यांची

वेशभूषा साकारली होती. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष अभिजीत पाटील , इंग्रजी माध्यम व्यवस्थापक राजेश पाटील, मराठी माध्यम व्यवस्थापक दीप्ती आकरे , ,इंग्रजी माध्यम

प्राचार्य कार्मीलिन डिसुझा, मराठी माध्यमाचे प्राचार्य बाळकृष्ण गायकवाड ,एच. आर. व्यवस्थापक चैताली पाटील, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथालय प्रमुख प्रज्ञा जाधव व सांस्कृतिक विभागाचे संग्राम मोरे ,मयूर पाटील यांनी केले होते.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक हरेश चाभरे यांनी केले.

अँग्लो उर्दू हायस्कूल चे शासकीय रेखाकला परिक्षेत उत्तुंग यश

अक्कलकोट/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य कलासंचालनालय मुंबई, शासकीय एलीमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड तथा शासकीय रेखाकला परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असुन, येथील अंजुमन तरगीबे तालीम शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित, अँग्लो उर्दु हायस्कूल च्या विद्यार्थ्यांनी दोन्ही परिक्षेत, घवघवीत यश संपादन केले असून शाळेचा निकाल शंभर टक्के लागला आहे.

एलीमेंटरी परिक्षेत कु. अंजुम जमादार हिने तर इंटरमिजिएट परिक्षेत अनुक्रमे अफराह सरनाईक व अनम बागवान या विद्यार्थीनींनी अ, श्रेणी घेऊन विशेष प्राविण्य मिळविले , एलीमेंटरी त , ब श्रेणी मिळविलेले विद्यार्थी अनुक्रमे : अब्दुल बागवान,सिराज बागवान, इरमसबा बेपारी,अल्तजीन फुलारी,अल्फिया गोलंदाज, अब्दुलरेहान इंडीकर,जिया फातिमा काझी,फैजान कुरेशी, सबा मुजावर, फजिलत नाईकवाडी, मुस्कान शेख,रिफत सुतार, मंतशा तांबोळी,यांनी तर इंटरमिजिएट मध्ये सना बेपारी,जोया पटेल,अल्फिया अन्सारी, जवेरिया अत्तार,आयेशा बागवान,,इ.तर उर्वरीत विद्यार्थ्यांनी कश्रेणी घेऊन. सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. सदर विद्यार्थ्यांना अतिथी कलाशिक्षक अतुल जाधव यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. व त्यांना शाळेतील कलाविभाग प्रमुख तसनीम शेख यांचे सहकार्य लाभले.

शाळेचे प्राचार्य सैफुद्दीन काझी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार केला तर संस्थेचे अध्यक्ष जुबेर हिप्परगी,चेअरमन शगुफ्ता शेख,सचिव जफर हिप्परगी,सहसचिव लियाकत येडशीकर,सदस्य हाजीयुन्नुस शेख,आरिफ पिरजादे. यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.तर शाळेतील सर्व शिक्षकांनी त्यांच्या पुढील वाटचालीत शुभेच्छा दिल्या.

उल्हासनगर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत गुणगौरव कार्यक्रम

उल्हासनगर /बाळासाहेब अहिरेः उल्हासनगर महानगरपालिका बालकल्याण विभागामार्फत दिनांक २७/०२/२०२४ रोजी मिड टाऊन हॉल, गोल मैदान, उल्हासनगर - २. येथे दुपिरी १२.०० वाजता गुणगौरव सत्कार सोहळा कार्यक्रम राबविण्यात आला आहे.

सदर कार्यक्रम उप आयुक्त, महिला व बालकल्याण विभाग डॉ. सुभाष जाधव तसेच महापालिका जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे, विभाग प्रमुख (महिला व बालकल्याण) श्री. नितेश रंगारी उपस्थित होते. मा. उप आयुक्त, महिला व बालकल्याण विभाग यांनी स्त्री सक्षमीकरण, बळकटीकरण, सशक्तीकरण, विकास इत्यादी बाबींवर समाजामध्ये योग्य संदेश

पोहचावा या हेतुने महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातुन काबड कष्टकरी अत्यंत प्रतिकूल परिस्थीत योग्य पालकत्व निभावले व आपल्या मुलांना योग्य शिक्षण देवून त्यांना आपल्या पायावर उभे केले उल्हासनगर शहरातील अशया महिलांसाठी व परिक्षेमध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या अत्यंत मेहनती विद्यार्थ्यांना/मुलींना व पालकाना मुलींना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

माणसांचे जगणे हिच माझ्या साहित्याची प्रेरणा होय : सीताराम सावंत

पंढरपूर/प्रतिनिधीः समाज जीवनातील विदारक परिस्थितीमुळे मन अस्वस्थ होते. सामाजिक प्रश्र्नांमुळे निर्माण झालेली अस्वस्थता मी साहित्यातून मांडत राहतो. माझ्या कथा आणि कादंबरीतून माणदेशातील प्रदेशाचे चित्रण येते. माणदेशातील चालती बोलती माणसे ही माझ्या साहित्यातील व्यक्तिरेखा आहेत. माणसांचे जगणे आणि त्यांचा संघर्ष ही माझ्या साहित्याची प्रेरणा आहेत. असे प्रतिपादन ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक सीताराम सावंत यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात मराठी विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी भाषा गौरव दिना'निमित्त आयोजित 'साहित्याची निर्मिती प्रक्रिया' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे हे होते. सीताराम सावंत पुढे म्हणाले की, महिमानगड आणि माण परिसरातील दुष्काळी परिस्थितीमुळे तेथील लोकांचे झालेले स्थलांतर विविध समस्यांना कारणीभूत ठरले त्याचा परिणाम म्हणून अनेक शाळांमधील तुकड्या बंद झाल्या. याचे वर्णन 'देशोधडी' या कादंबरीत आलेले आहे. तर कराड परिसरातील काळी कसदार जमीन बांधकाम व्यवसायिकांच्या घशात गेली. त्यावर मोठ मोठ्या इमारती उभारल्या गेल्या. त्या जमिनीवर येथून पुढे कधीही पिके उगवणार

नाहीत. या जमिनीने गेल्या अनेक वर्षापासून कित्येकांची भूक भागविली. सर्जनशीलता हा त्या भूमीचा मूळ असणारा गुणधर्म यापुढे नष्ट केला जाईल. ही भावना 'भुई भुई ठाव दे' या कादंबरीत आली आहे. वर्तमानपत्रातून घेण्यात आलेल्या कथा स्पर्धांनी मला लिहिते केले.

ध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे म्हणाले की, इतर भाषेच्या अतिक्रमणामुळे मराठी भाषेवर परिणाम होतो आहे. मराठीचा सातत्याने ध्यास घेवून साहित्याची निर्मिती अनेकजण करतात. माणसाच्या आयुष्यातील प्रत्येक घटनेतून कथा निर्माण होवू शकते. समाजातील अनेक प्रश्र्न साहित्यातून हाताळले जातात. तेंव्हा साहित्य हे माणसाच्या मनाची आणि मेंदूची मशागत करते म्हणून साहित्याचे वाचन आपण केले पाहिजे. पुढच्या पिढीला समृद्ध भाषेचा आणि संस्कृतीचा वारसा बहाल करण्यासाठी त्याचे संवर्धन होणे अपेक्षित आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रमेश शिंदे यांनी करून दिला. या कार्यक्रमास कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, शास्त्र विभागाचे उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, डॉ. अनिल चोपडे, डॉ. अमर कांबळे, पर्यवेक्षक प्रा. युवराज आवताडे, सिनिअर, ज्युनिअर व व्होकेशनल विभागातील शिक्षक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. हरभजन कांबळे, डॉ. सुमित साळुंखे, प्रा. राजेंद्र मोरे, अभिजित जाधव, सुरेश मोहिते, ओंकार नेहतराव यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. दत्तात्रय डांगे यांनी मानले.

प्रा.विजय मारुलकर यांच्या समाजशास्त्रीय सिद्धांत या सर्वसमावेशक पुस्तकाचे शनिवारी प्रकाशन

कोल्हापूर : येथील प्रा.विजय मारुलकर लिखित समाजशास्त्रीय सिद्धांत या सर्वसमावेशक पुस्तकाचे प्रकाशन शनिवार दि.०२ मार्च २०२४ रोजी राजारामपुरी १३ वी गल्लीतील कोरगावकर हॉल मध्ये दुपारी ४ : वाजता होणार आहे.अशी माहिती प्रा.अश्र्विनी मारुलकर यांनी दिली. प्रा.विजय मारुलकर यांनी श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठातील समाजशास्त्र विभागामध्ये प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून ३५ वर्षे अध्यापनाचे



कामकाज पाहिलेले आहे. त्यांनी वैद्यकीय समाजशास्त्र विषयातून पीएच.डी. संशोधन केले असून अनेक विद्यापीठामध्ये त्यांनी विविध समित्यांवर कामकाज पाहिलेले आहे.समाजशास्त्राचे जाणकार अभ्यासक म्हणून त्यांना ओळखले जाते. त्यांनी यापूर्वी समाजशास्त्र विषयावर अनेक पुस्तके लिहिलेली आहेत. त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाकडून यापूर्वी एमिरेटस प्रोफेसरची फेलोशिप मिळाली होती. सेवा निवृत्तीनंतर ही त्यांनी लेखनाची आवड जोपासली असून समाजशास्त्रीय सिद्धांत या संदर्भग्रंथाचे प्रकाशन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य डॉ.दिलीप पांढरपट्टे यांच्या हस्ते व छत्रपती संभाजीनगर येथील विद्या बुक्स पब्लिशर्स चे प्रकाशक शशिकांत पिंपळापुरे आणि श्री.गुजराती सेवा समाज सांगलीचे माजी अध्यक्ष रमणिकलाल दावडा यांच्या उपस्थितीत व जेष्ठ समाजशास्त्रज्ञ प्रा डॉ.एस.एन.पवार यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

तरी समाजशास्त्र विद्यार्थी, अभ्यासक,संशोधक व प्राध्यापक यांनी पुस्तक प्रकाशन कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे असे आवाहन प्रा.अश्र्विनी मारुलकर यांनी केले आहे.

जगदगुरू पंचाचार्य प्रशालेत दहावी विद्यार्थ्यांना निरोप

अक्कलकोट/प्रतिनिधीः गौडगाव बु!! येथील श्री गुरु सिद्धमल्लेश्र्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगदगुरू पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेतील इयत्ता दहावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पाडला.अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रतिनिधी योगीराज हिरेमठ होते.प्रारंभी संस्थेचे ज्येष्ठ सल्लागार नागप्पा पाटील व प्रशालेचे सेवानिवृत्त पर्यवेक्षक नारायण मोरे यांच्या हस्ते गुरु सिद्धमल्लेश्र्वर व सरस्वती मातेची प्रतिमेची पूजन करण्यात आले. दीप प्रज्वलन सरपंच कमलाबाई राठोड,उपसरपंच वृषाली भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले.प्रशालेचे मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत व सत्कार केले.यावेळी कुमारी

भाग्यश्री पाटील,अश्र्विनी निम्बर्गी,सोमनाथ रोडगे, अक्षता पाटील,ज्योती कुंभार,वैष्णवी कुंभार, पूर्वा राठोड,कुमारी बनसोडे,कुमारी चव्हाण,प्रियांका कुंभार ,सारिका खानापुरे,रक्षाता पाटील या विद्यार्थ्यांनी शाळेविषयी व गुरुजना विषयी कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी उपसरपंच वृषाली भालेराव यांनीही विद्यार्थ्यांना परीक्षा विषयी मार्गदर्शन सूचना व शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले नारायण मोरे सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये यशस्वी व्हायचा असेल तर जिद्दीने. चिकाटीने, प्रामाणिकपणे कष्ट केले तर जीवनामध्ये यश निश्र्चित मिळेल असे सांगून परीक्षार्थींना हार्दिक शुभेच्छा दिले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इयत्ता दहावीचे वर्ग शिक्षक गंगाधर नागशेट्टी,शरणया हिरेमठ,रामणा लिंबेतोटेसह सर्व शिक्षक व सेवक वर्गांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवपुत्र चोळे यांनी केली तर आभार लाडप्पा शिंदे यांनी मानले.

खूप दिवसांनी मनोभावे स्वामींच्या दर्शनाने आनंद : मा.महान क्रिकेटपटू वेंगसरकर

अक्कलकोट/प्रतिनिधीः आज येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरात आल्यानंतर स्वामींच्या या वटवृक्षाखाली बसून स्वामींचे जप व स्मरण केलेले प्रसंग माझ्या जीवनातील सगळ्यात अनमोल असे प्रसंग आहेत, कारण आम्ही वेंगसरकर कुटूंबीय हे पुर्वीपासूनच स्वामी भक्त आहोत. आज पुन्हा एकदा या वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात आल्यानंतर मंदिरातील बदल पाहून तसेच स्वामींच्या दर्शनाने आपल्याला चित्ताला शांती लाभून खूप दिवसांनी मनोभावे स्वामींच्या दर्शनाने आनंद झाला असल्याचे मनोगत भारतीय क्रिकेट संघाचे मधल्या फळीतील भुतपुर्व महान फलंदाज दिलीप वेंगसरकर यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी दिलीप वेंगसरकर यांचा श्रींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सत्कार केला. या प्रसंगी वेंगसरकर बोलत होते. पुढे बोलताना वेंगसरकर यांनी सन १९८३ साली भारतीय क्रिकेट संघाकडून युरोपमध्ये आपणास क्रिकेट विश्र्वचषक खेळण्याची संधी मिळाली. त्या

काळी युरोपला जाण्यातत्पुर्वी आपण स्वामींचे नामस्मरण नित्यपणे करुनच लंडनला गेल्यानंतर भारतीय संघाने थेट विश्र्वचषकाला गवसणी घातल्याचा आनंद आजही आपणास असल्याच्या आठवणींना उजाळा दिल्या. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्र्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, प्रसाद सोनार, संजय पवार, श्रीकांत मलवे, स्वामीनाथ लोणारी, सागर गोंडाळ, ऋषिकेश लोणारी आदींसह अन्य भाविक भक्त उपस्थित होते.